सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT




## ‘झेडपी’त मर्जीतील कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**● अधिकाराचा गैरवापर**

**● विरोधानंतर प्रक्रिया थांबवली**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेत कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी असलेल्या नियमांचा आधार घेत मर्जीतील कर्मचाऱ्यांना विशिष्ट पदांवर ठेवण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार समोर आला आहे. सोलापूर जिल्हा परिषदेत यापूर्वीही काही कर्मचाऱ्यांना विशिष्ट पदांवर कायम ठेवण्यासाठी विविध नियमांचा आधार घेतल्याचे प्रकार चर्चेत आले होते.




एका विशिष्ट नियमाचा आधार घेत अर्थ विभागातील एका कर्मचाऱ्याची अक्कलकोट येथून मुख्यालयात बदली करण्यात आली आणि त्यानंतर त्यांची नियुक्ती नियमित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यानंतर या बदलीचा आधार घेत हब्बू नावाच्या आणखी एका कर्मचाऱ्याची फाईल प्रशासनाकडे पुढील प्रक्रियासाठी पाठवण्यात आली.

एका कर्मचाऱ्यासाठी वापरण्याऐवजी लिपिक, ग्रामसेवक, आरोग्यसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, पशुधन पर्यवेक्षक, मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख यांच्या पदोन्नती प्रक्रियेलाही समानपणे लागू करावा, अशी मागणी करत जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाने त्यास विरोध केला. त्यावरुन संबंधित कर्मचाऱ्याची फाईल थांबविण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

### ■ तदर्थ पदोन्नतीचा नियम?

शासकीय सेवेत तदर्थ पदोन्नती हा एक विशेष नियम आहे. एखाद्या पदावर तातडीने कर्मचारी उपलब्ध नसल्यास किंवा नियमित पदोन्नती प्रक्रिया विलंबित झाल्यास कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी हा नियम वापरला जातो. या नियमांतर्गत कर्मचाऱ्याला तात्पुरती पदोन्नती देऊन नियुक्ती केली जाते. मात्र ही पदोन्नती कायमस्वरुपी नसते. संबंधित पदावर नियमित नियुक्ती होईपर्यंतच ही व्यवस्था लागू असते. तसेच अशा पदोन्नतीमुळे त्या कर्मचाऱ्याला कायमस्वरुपी पदावर राहण्याचा कायदेशीर अधिकार मिळत नाही. सहसा हा नियम अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत, ज्येष्ठता यादीतील वाद किंवा सेवा नियमांमधील अडचणींमुळे वापरला जातो.

### ■ नियमाच्या वापरावरुन प्रश्नचिन्ह

जिल्हा परिषदेत यापूर्वी हा नियम फारसा वापरात नसल्याचे सांगितले जाते. मात्र अलीकडे अक्कलकोट येथील एका कर्मचाऱ्याला या नियमाचा आधार देण्यात आला. त्यानंतर दुसऱ्या कर्मचाऱ्याचीही फाईल पुढे आल्याने या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गरज नसताना या नियमाचा आधार घेतला जात असल्याचा आरोप कर्मचारी महासंघाने केला आहे. या नव्या पायंड्याबाबत कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आणि चिंता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रक्रियेबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात आली नसल्याची चर्चा कर्मचाऱ्यांमध्ये सुरु आहे.

## ‘मिनी मंत्रालय’संदर्भात पडद्यामागे हालचाली

### अध्यक्षपदासाठी सोशल इंजिनिअरिंगचा फॉर्म्युला?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मार्च-**



सोलापूर महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता काबीज केली. आता जिल्हा परिषद अध्यक्षपदावरुन पक्षांतर्गत राजकीय हालचालींना वेग आला आहे. ‘मिनी मंत्रालय’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या येथील पदासाठी भाजपामध्ये पडद्यामागे राजकीय हालचाली सुरु असल्याची चर्चा आहे.

महापालिकेत सत्ता स्थापन करताना भारतीय जनता पार्टीने सोशल इंजिनिअरिंगचा फॉर्म्युला वापरत विविध समाजघटकांना सत्तेत वाटा दिला. त्यामुळे जिल्हा परिषदेतही हाच फॉर्म्युला कायम राहणार का? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या निवडीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या भूमिकेला महत्त्व असल्याचे मानले जात आहे. जिल्ह्यातील भाजपच्या विविध गटांनी निवडणुकीत चांगले यश मिळविल्याने प्रत्येक गट अध्यक्षपदावर आपला दावा मजबूत करण्याच्या हालचाली करत आहेत. अध्यक्षपद देताना सामाजिक समतोल साधला जाणार की पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने ज्या तालुक्याला सत्तेची गरज आहे त्या तालुक्याला संधी दिली जाणार? याबाबत विविध अंदाज बांधले जात आहेत.

**जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचे**

जिल्हा परिषद अध्यक्षपद हे जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. विविध विभागांच्या योजना, निधीचे नियोजन आणि विकासकामांवर या पदाचा मोठा प्रभाव असतो. जिल्हा परिषद अध्यक्षपदाला राजकीय वर्तुळात ‘मिनी मंत्रालय’ अशी ओळख मिळाली आहे. ज्या पक्षाचा किंवा गटाचा अध्यक्ष होतो. त्याचे संपूर्ण जिल्ह्यावर वर्चस्व राहते, असे बोलले जात आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### हिंदू जनजागृती समितीतर्फे उद्या जागृती सभेचे आयोजन

**सोलापूर, दि.९ मार्च-**

हिंदू धर्म आणि संस्कृतीवर होत असलेल्या विविध राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक आघातांविषयी जनजागृती करण्यासाठी सोलापूर येथे हिंदू जनजागृती समितीतर्फे बुधवार, दि.११ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता भवानी पेठ येथील जयभवानी प्रशाला येथे हिंदू राष्ट्र-जागृती सभेचे आयोजन करण्यात आले, अशी माहिती राजन बुणगे, हिरालाल तिवारी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या सभेत लेफ्टनंट कर्नल मनोजकुमार सिन्हा, सनातनच्या सद्‌गुरु स्वाती खाडये, हिंदू जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला ह.भ.प. धर्मनाथ जोशी, चंद्रकांत रमणशेट्टी, योगिनाथ फुलारे, प्रसाद पंडित आदी उपस्थित होते.

### रॅपिड सिटी ग्रुपचे अग्निशमन क्षेत्रात तीन प्रकल्प

**सोलापूर, दि.९ मार्च-**

सोलापुरात कामकाज सुरु करून पुढे अग्निशमन क्षेत्रात भारतात आणि परदेशात नाव मिळवलेले रॅपिड सिटी रॅपिड फायर ग्रुपतर्फे तीन प्रकल्प राबवण्यात येणार आहेत, अशी माहिती शशांक कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. रॅपिडेक्स ब्रँडमार्फत देशातील काही महत्वाच्या प्रकल्पांसाठी अग्निशामक यंत्रणेची उभारणी आणि देखभाल करण्याचे काम करते.स्वसुरक्षा आणि अग्निशमन क्षेत्रात, शिकलेल्या मनुष्यबळाची खूप मोठी मागणी आहे. सरकारमान्य असे रक्षा आणि अग्नीसुरक्षा क्षेत्रातील आवश्यक असणारे अभ्यासक्रम माफक किंवा गरजवंतांना मोफत, शिक्षणाची सोय, शिकत असतानाच प्रत्यक्ष कामावर अनुभव मिळवून देणारे महाविद्यालय स्थापन करण्यात येत आहे. सोलापुरातील उपलब्ध असलेले तज्ज्ञ कास्टिंग कामगार, वस्त्र निर्माण क्षेत्रातील कामगार आणि मनुष्यबळ याचा विचार करुन सुरक्षा साहित्य निर्माण करण्याचा प्रकल्प सोलापुरात उभा करण्याची तयारी केलेली आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी अर्जुन चव्हाण उपस्थित होते.

## आदिवासी क्षेत्रातील शिक्षक भरतीला वेग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मार्च-**

अनेक वर्षांपासून रखडलेल्या पेसा (अनुसूचित क्षेत्र) भागातील शिक्षक भरती प्रक्रियेला अखेर गती मिळाली असून राज्य सरकारने १७ संवर्गातील पदे भरण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे आदिवासी क्षेत्रातील शिक्षक भरती ला वेग आला आहे. पेसा क्षेत्रातील भरती बंद असल्यामुळे १३ जिल्ह्यांतील आदिवासी क्षेत्रातील ४६० हून अधिक उमेदवार सध्या सोलापूर जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांमध्ये कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे.



भरती प्रक्रिया सुरु झाल्यानंतर सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील उमेदवारांनाही स्वतःच्या जिल्ह्यात नोकरीची संधी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सामान्य प्रशासन विभागाने ११ फेब्रुवारी रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून भरती प्रक्रिया राबविण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यानंतर शालेय शिक्षण विभागाने २० फेब्रुवारी रोजी पुढील कार्यवाहीसंदर्भात आवश्यक निर्देश जारी केले आहेत. या निर्णयानुसार अहमदनगर, अमरावती, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जळगाव, नांदेड, नंदुरबार, नाशिक, पालघर, पुणे, ठाणे आणि यवतमाळ या जिल्ह्यांतील जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

यापूर्वी जाहिरात प्रक्रियेद्वारे पात्र ठरलेल्या अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील उमेदवारांना आरक्षणाच्या मर्यादेत गुणवत्तेनुसार नियुक्ती देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. नियुक्तीनंतरही काही पदे रिक्त राहिल्यास ती ‘पवित्र’ प्रणालीद्वारे भरली जाणार आहेत. आयुक्त (शिक्षण) सचिन्द्र प्रतापसिंह यांनी ही प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. टेट २०२२ उत्तीर्ण अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना गुणवत्तेनुसार नियुक्ती देण्यास पूर्वी परवानगी देण्यात आली होती. तसेच या उमेदवारांना ‘पवित्र’ पोर्टलमार्फत सर्वसाधारण भरती प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देण्यात आली होती.

**न्यायालयीन प्रक्रियेमुळे भरती रखडली**

१ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार ग्रामविकास विभागामार्फत पेसा क्षेत्रातील पदभरती करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र पेसा क्षेत्रातील आरक्षणासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिका आणि त्याविरोधातील सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका प्रलंबित असल्यामुळे ही भरती प्रक्रिया थांबली होती.

**हजारो उमेदवारांना दिलासा**

राज्यातील पेसा क्षेत्रातील शिक्षक भरती अनेक वर्षांपासून रखडली होती. त्यामुळे हजारो पात्र उमेदवार नोकरीच्या प्रतीक्षेत होते. आता शासनाने भरती प्रक्रियेला परवानगी दिल्यामुळे हजारो उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**राज्यभरातील उमेदवारांना संधी द्यावी**

पेसा क्षेत्रातील भरती बंद असल्यामुळे अनेक उमेदवारांना इतर जिल्ह्यांमध्ये नोकरी मिळाली आहे. त्यामुळे आता भरती करताना राज्यातील सर्व पात्र उमेदवारांना समान संधी मिळावी, अशी मागणी करण्यात येत असल्याचे स्पर्धा परीक्षा विद्यार्थी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले आहे.

## मुंबई विमानसेवा ७ ऐवजी ५ दिवस राहणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

विमानसेवेला वाढता प्रतिसाद पाहून स्टार एअर कंपनीने आठवड्यातील चार दिवसांची सेवा सात दिवस केली. पण मागील १५ दिवसात प्रवाशांचा प्रतिसाद कमी झाल्याने आता ७ ऐवजी ५ दिवस सेवा सुरु केली आहे. सोमवारी आणि बुधवारी असलेली सेवा रद्द करण्यात आली आहे. यामुळे आता आठवड्यातून पाच दिवस मुंबईसाठी विमानसेवा सुरू राहणार आहे. तर दुसरीकडे गोवा-सोलापूर विमानसेवेस चांगला प्रतिसाद मिळत आहे.



नागरिकांच्या मागणीनुसार मुंबईसाठी विमानसेवा सुरु करण्यात आली आहे. पहिले दोन महिने प्रवाशांकडून मोठा प्रतिसाद मिळत राहिला. पण फेब्रुवारी महिन्यापासून प्रवाशांची संख्या घटत आहे. मागील १५ दिवसात ही संख्या ३० ते ४० इतकीच असल्याचे सांगण्यात आले. सोलापूरहन मुंबईला जाणारी संख्या चांगली आहे. परंतु मुंबईहून सोलापूरकडे येणाऱ्या प्रवाशांची संख्या खूपच कमी आहे. रिकाम्या राहणाऱ्या सीटसाठी शासनाने अनुदान दिल्याने विमानसेवा सुरु आहे. अनुदान बंद झाल्यानंतर विमानसेवा देणाऱ्या दिवसाच्या कालावधीत पुन्हा घट होण्याची शक्यता आहे.

**एप्रिलमध्ये तिरुपती विमानसेवा?**

सोलापूर ते तिरुपती विमानसेवा सुरू करण्याची मागील अनेक महिन्यांपासूनची मागणी आहे. यावर स्टार कंपनीकडून विचार केला जात आहे. तिरुपतीसाठी सोलापूर शहरातून किती प्रतिसाद मिळणार याबाबत सर्वे ही करण्यात आला आहे. कंपनीने पुणे ते सोलापूर ते तिरुपती असे नियोजन केले आहे. पण पुणे विमानतळावर स्लॉट मिळत नसल्याने विमानसेवा पुढे ढकलण्यात आली होती. पण उन्हाळी सुट्टीचा लाभ घेण्यासाठी एप्रिल महिन्यात सेवा सुरु होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मात्र कंपनीकडून यास दुजोरा मिळाला नाही.

## सिध्दरामाच्या नगरीत स्वागत कमानी उभारा

**सोलापूर :** सिध्दरामाच्या नगरीत अर्थात ग्रामदैवत श्री शिवयोगी सिध्दरामेश्वर यांचे मंदिर शहरात असल्याचे परगावहून येणाऱ्या भाविकांना माहिती व्हावी यासाठी शहरात प्रवेश करणाऱ्या मार्गावर स्वागत कमानी तसेच शहरातील प्रत्येक चौकामध्ये श्री सिध्देश्वर मंदिराकडे जाणारा मार्ग असे लिहिलेले फलक उभे करावेत, अशी मागणी वीरशैव व्हिजनतर्फे महापौर विनायक कोंड्याल यांच्याकडे करण्यात आली. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार, व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, युवक आघाडी अध्यक्ष सोमनाथ चौधरी, सोशल मीडिया प्रमुख अमित कलशेट्टी, कार्यकारणी सदस्य योगेश कापसे, नागराज कोंडे कार्याध्यक्ष शिवानंद सावळगी, बसवराज चाकाई, कार्तिक स्वामी, लोकेश इरकशेट्टी व अजिंक्य कटाप उपस्थित होते.

## व्यावसायिक गॅस बुकींग बंद; घरगुती नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

मार्च २०२६ मधील पश्चिम आशियातील इस्त्रायल-इराण तणावामुळे भारताला होणाऱ्या नैसर्गिक वायू पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. कतारकडून होणाऱ्या पुरवठ्यातील व्यत्ययामुळे सीएनजी आणि पीएनजी च्या दरात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महागाई कमी करण्यासाठी भारत कॅनडा आणि ऑस्ट्रेलियाकडून अतिरिक्त गॅस आयात करण्याच्या तयारीत आहे. सध्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार व्यावसायिक गॅस पुरवठा बुकिंग बंद केली असून, घरगुती गॅसच्याही दरात ६० रूपयांनी वाढ केली आहे. कतारच्या एका निर्णयामुळे भारताच्या गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला असून, सीएनजी-पीएनजीचे दर महागण्याची भीती आहे. सध्या घरगुती गॅस ६० रुपयांनी महागला आहे. दरम्यान, पर्यायी पुरवठा म्हणून मध्यपूर्वेतील तणावामुळे भारताने कॅनडा आणि ऑस्ट्रेलियाकडून अतिरिक्त गॅस घेण्याचा निर्णय घेतला आहे. हायटेक पातळीवरून हे निर्णय होत आहेत. गॅस सिलिंडर बुकिंगचे नियम बदलले असून, आता एका सिलिंडर डिलिव्हरीनंतर दुसरे सिलिंडर बुक करण्यासाठी २१ दिवसांचा कालावधी अनिवार्य करण्यात आला आहे. तर विदर्भातील कोळशाचे रुपांतर ’सिंथेटिक नॅचरल गॅस’ मध्ये करण्याचे काम सुरू असून, स्वच्छ इंधननिर्मितीसाठी हे मोठे पाऊल पडणार असल्याचे कळते.




**कृत्रिम गॅस टंचाई केल्यास कडक कारवाई**

गॅस तुटवड्याबाबत गॅस कंपन्यांच्या सेल्स ऑफिसर यांच्याबरोबर चर्चा करून आढावा घेण्यात आला आहे. जिल्ह्यात घरगुती गॅसचा सध्या तरी तुटवडा नाही. युध्दजन्य स्थिती अशीच चालू राहिली तर घरगुती, एलपीजी गॅस तुटवडा निर्माण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. कृत्रिम टंचाई करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यासाठी जिल्हा स्तरावर दक्षता, फिरती पथके नेमण्यात यावीत. तसेच आजवर केलेल्या कारवाईचा अहवाल त्या-त्या तहसीलदारांकडे मागितला आहे, असे जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी सांगितले.

## कुठं सुगी तर कुठं हुरड्याचा बेत!

**✔ अतिवृष्टीमुळे पेरणीत पडले मोठे अंतर ✔ अनेकांची ज्वारी बाजारात दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

गतवर्षी खरिपाच्या हंगामात अतिवृष्टी आणि महापूर आल्याने रब्बी हंगामासाठी जमिनीचा वापसा वेळेत झाला नाही; यामुळे रब्बीच्या पेरण्या विविध भागात मागे-पुढे झाल्या. काही ठिकाणी तर तब्बल महिनाभराने उशिरा पेरण्या झाल्याने त्या भागात सध्याही कोवळा हरभरा अन् हुरडा पार्ट्यांवर ताव मारणे चालू असल्याचे दिसून येत आहे. तर काही भागात ज्वारीच्या राशी झाल्या अन् बाजारात मालही विकला गेल्याचे दिसून येत आहे. या आघाडीच्या शेतकऱ्यांनी आपला कडबाही विकला असून, आगामी खरीप हंगामासाठी आंतरमशागती सुरू केल्याचे दिसून येत आहे.



यंदा दमदार पावसामुळे रब्बी हंगामाला संजीवनी मिळाली असून, अनेक भागात ज्वारीचे पीक सध्या जोमात आले आहे. शेतशिवारात मोत्यासारखी डोलणारी कणसे पाहून खरीप हंगामातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे दुःख बळीराजा विसरू लागला आहे. सध्या ज्वारी हुरड्यात आली असून, पाखरांना हुसकावण्यासाठी गोफणीचे आवाज आणि शेतकऱ्यांच्या आरोळ्यांनी काही भाग मार्चमध्येही दुमदुमतो आहे. मराठवाड्याच्या अनेक मंडळांत ओल्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती. जमिनीचा वापसा लवकर झाला नसल्याने ज्वारीची पेरणी लांबली आहे. काहीजणांनी हरभरा आणि गहू घेणेच पसंद केले. या परिस्थितीत काही शेतक-यांनी कोरडवाहू ज्वारीचे पीक पाणी उपलब्ध असतानाही घेण्याचे नियोजन केले आणि त्यात पेरणी झाली आहे. हे पीक तरारले आहे. पिकाची वाढ गतीने होवून ही ज्वारी १० ते १२ फूट उंच आली आहे.



गतवर्षी अतिवृष्टीमुळे खरिपातील उडीद, मूग आणि सोयाबीनसारखी नगदी पिके हातची गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला होता; मात्र आता रब्बीतील भरघोस पिकाने या नुकसानीवर मलमपट्टी केली असल्याचे चित्र सध्यातरी दिसून येत आहे. काही असले तरी यंदा ज्वारी कमी असल्याने बाजारात ज्वारी आणि कडबा भाव खाणार असे चित्र सध्या तरी दिसून येत आहे.

## जि.प.च्या ८७०० शिक्षकांपैकी फक्त १२३१ ‘टीईटी’ उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांच्या पात्रतेबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. जिल्ह्यातील २७७५ जिल्हा परिषद शाळांमध्ये एकूण ८७०० शिक्षक कार्यरत असून त्यापैकी केवळ १२३१ शिक्षकच ‘टीईटी’ उत्तीर्ण असल्याचे स्पष्ट झाले आहे.सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार ५३ वर्षांखालील सर्व शिक्षकांनी दोन वर्षांत ‘टीईटी’ उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांच्यावर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई होण्याची शक्यता आहे.

२०१३ पूर्वी ‘टीईटी’ बंधनकारक नव्हती. मात्र १३ फेब्रुवारी २०१३ पूर्वी शिक्षक भरतीसाठी ‘टीईटी’ उत्तीर्ण असणे बंधनकारक नव्हते. त्यामुळे त्या काळात अनेक शिक्षक शैक्षणिक पात्रतेच्या आधारे सेवेत दाखल झाले. मात्र आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांनाही ‘टीईटी’ उत्तीर्ण होणे आवश्यक झाले आहे.

**शिक्षकांना मिळणार सहा संधी :** राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून शिक्षकांना ‘टीईटी’ उत्तीर्ण होण्यासाठी सहा संधी दिल्या जाणार आहेत. चालू वर्षात जुलैमध्ये एक परीक्षा, नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये दोन परीक्षा, २०२७ पर्यंत आणखी तीन परीक्षा या सर्व संधींमध्ये शिक्षकांनी ‘टीईटी’ उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**३८ शाळा मुख्याध्यापकाविना :** ‘टीईटी’ उत्तीर्ण असणे पदोन्नतीसाठीही आवश्यक असल्यामुळे अनेक शिक्षकांना पदोन्नती देता आलेली नाही. सोलापूर जिल्हा परिषदेत सध्या ३८ शाळा नियमित मुख्याध्यापकांविना कार्यरत आहेत. ‘टीईटी’ उत्तीर्ण सेवाज्येष्ठ शिक्षक उपलब्ध नसल्याने ही समस्या निर्माण झाल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.




**दोन वर्षांत ‘टीईटी’ उत्तीर्ण व्हावे लागणार :** शाळांमधील ‘टीईटी’ उत्तीर्ण शिक्षकांची माहिती शालेय शिक्षण विभागाला पाठविण्यात आली आहे. साडेआठ हजार शिक्षकांपैकी १२३१ शिक्षक ‘टीईटी’ उत्तीर्ण आहेत. सेवानिवृत्तीसाठी पाच वर्षे शिल्लक असलेले शिक्षक वगळता उर्वरित सर्वांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दोन वर्षांत ‘टीईटी’ उत्तीर्ण व्हावे लागणार आहे, असे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३७८

**पै केशांचा गुंडाळा । ठेविली स्फटिकशिळा ।**
**ते वरी पाहिली डोळां । तंव भेदली गमली ।।**

वेगवेगळे विषय जाणून घेण्याची अर्जुनाची भूक वाढतच आहे. ही भूक भागविण्याचा उत्कृष्ट प्रयत्न भगवंताकडून होतांना दिसत आहे. अर्जुनाच्या अगोदर मार्गदर्शन करण्याची भूक श्रीकृष्णांनाच लागली आहे हे विशेष. परब्रम्ह म्हणजे नेमके काय ? या अर्जुनाच्या प्रश्नावर उत्तर देतांना भगवंत सांगत आहेत. या फुटक्या देहात दाट भरले असतानाही जे गळत नाही, त्याचा सुक्ष्मपणा शून्यच असल्याचे दिसते. तसेच जे अत्यंत सूक्ष्म असून सुध्दा झिरझिरीत असलेल्या प्रपंचरुप वस्त्राच्या गाळणीतून हलविले तरी गळत नाही, ते परब्रम्ह होय. जन्माचा विकार न जाणणा-या आणि कधीही नाश पावत नाही, त्या ब्रम्हाचे जे अखंडत्व, त्या अखंडत्वास अध्यात्म म्हणतात. ब्रम्हांडात अनेक वेगवेगळया प्रकारचे जीव निर्माण होतात, नाश पावत असतात. याचे मुळ पाहू गेले तर शून्य दिसते. मूळ निमित्तकारण जो कर्ता, तोच दिसत नाही. उत्पादन करणारे कोणतेच, कांहीच दिसत नाही. कार्यच तेवढे स्वभावत: वाढू लागते. कर्त्यावाचून आणि कारणावाचून हा जो विश्वाकार व्यापार निर्माण होतो, त्याला कर्म म्हणतात.



अर्जुनाला भगवंतांनी परब्रम्ह, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ अशा अनेक बाबी आतापर्यन्त समजावून सांगीतल्या आहेत. मुळात हया सर्व एकातूनच निर्माण झाल्या आणि त्या सर्व एकातच विलिन होत असतात. त्यामुळे ते सर्व एकच आहे. पण केवळ अविदयेने, अज्ञानाने हे सर्व वेगवेगळे भासतात. अविदयेचा पडदा नसता तर ते एकच दिसले असते. कारण मुळात ते एकच आहे. मुळात हे कांही भिन्न कसे नाही. हे स्पष्ट करतांना भगवंत म्हणतात, पै. केशांचा गुंडाळा । ठेविली स्फटिकशिळा । ते वरी पाहिली डोळां । तंव भेदली गमली ।। अर्थात, केशाचा गुंडाळलेला झुपका आहे आणि त्यावर स्फटीकाची शिळा ठेवली तर ती बाहेरुन पाहता फुटलेली दिसते. पण जर ते केस त्या स्फटिक शिळेपासून दुर केले, तर शिळेचा भंगलेपणा दिसत नाही. अर्थात शिळा मुळचीच अखंड होती. मात्र केसाच्या संगतीने ती भंगलेली दिसत होती. केस बाजुला केल्यानंतर ती जशीच्या तशी असल्याचे दिसुन येते. अगदी याच प्रमाणे देहेंद्रियावरील अहंभाव गेला किंवा बाजुला केला तर जीवाचे ब्रम्हाशी ऐक्य अगोदरच असल्याचे दिसून येईल. कर्मजन्य सकाम यज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ असल्याने, त्याने अहंभाव जातो आणि ज्ञानी ब्रम्हाशी एकरुप होतो. माणूस मी पणामुळे, अहंभावमुळे मुळ चैतन्यापासून स्वत:ला वेगळा समजतो, जगात भिन्नता पाहतो.लहान-मोठा, गरीब-श्रीमंत असे वेगवेगळे भेद केवळ अहंभावामुळे करतो. माणसाचा अहंभाव जर गेला तर ब्रम्ह हे माणसापासुन वेगळे नसल्याचे त्याला जाणीव होईल. सर्व जीव सृष्टी ही एकाच ब्रम्हाची उत्पत्ती असल्याने त्याच्यात भेद पाहण्याचे कांही कारण नाही. अर्थात, सर्वत्र समता दिसण्यासाठी प्रथम आपल्यातून अहंभाव, मीपणा काढून टाकला पाहिजे. हा अहंभाव, मीपणा आपणच निर्माण केला असल्याने त्याला आपणच काढुन टाकले पाहिजे. जेव्हा हा मीपणा निघुन जाईल तेव्हा सर्वत्र समता दिसुन आपणाला आनंद मिळू लागेल.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार,**
**दि. १० मार्च २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - फाल्गुन कृ. सप्तमी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- अनुराधा (१९.०४)**
**योग - हर्षण (०८.२०)**
**करण - विष्टी (१२.३९)**
**राहू काल : मंगळवार दु. ३.०० ते ४.३०**

**दिनविशेष :**
**सावित्रीबाई फुले स्मृतिदिन.**
**१९८५: भारताने पाकिस्तानला पराभूत करून मेलबोर्न येथे बेन्सन ॲण्ड हेजेस चॅम्पियनशिप हि क्रिकेट स्पर्धा जिकली.**
**१९८५: भारतीय क्रिकेट संघाने रवि शास्त्री यांना चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स हा किताब मिळाला.**



# पतसंस्थांच्या थकीत कर्ज वसुलीसाठी स्वतंत्र निबंधक द्या

### सहकारमंत्र्यांकडे सोलापूर फेडरेशनची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी पतसंस्थांच्या वाढत्या थकीत कर्ज वसुलीच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी जिल्हा स्तरावर स्वतंत्र सहाय्यक निबंधक पद निर्माण करावे, अशी मागणी सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पतंगे आणि उपाध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी यांनी राज्याचे सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

सोलापूर जिल्ह्यात सध्या सुमारे ११०० पेक्षा अधिक सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना या संस्थांमार्फत मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा केला जातो. मात्र, गेल्या काही वर्षांत कर्ज वसुलीची गती मंदावल्या मुळे अनेक पतसंस्थांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. इतर काही जिल्ह्यांमध्ये पतसंस्था फेडरेशनच्या कलम १०१ अंतर्गत प्रकरणे हाताळण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

त्याच धर्तीवर सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनसाठी स्वतंत्र सहाय्यक निबंधक किंवा सहकारी अधिकारी (परसेवा) पदाची निर्मिती करण्यात यावी, असेही या निवेदनात म्हटले आहे.

# आई जगदंबेच्या दर्शनासाठी आता थेट रेल्वेने जाता येणार?

## ●गुरुवारी जिल्हाधिकाऱ्यांनी ठेवली रेल्वे अधिकाऱ्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव दरम्यान वीन रेल्वे मार्ग प्रकल्पासाठी राज्य शासनाने १५० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास ६ फेब्रुवारी २०२६ रोजी मंजुरी दिली आहे. तीर्थक्षेत्र तुळजापूरला रेल्वेने जोडण्यासाठीच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला यामुळे मोठी गती मिळणार असून, आता भाविकांना आई जयदंबेच्या दर्शनासाठी थेट रेल्वेने जाता येणार आहे. दरम्यान, या कामाला गती देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी गुरूवारी रेल्वेच्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची बैठक बोलावली असल्याची माहिती नायब तहसीलदार तुकाराम कोळी यांनी दिली.



सोलापूर-धाराशिव रेल्वेसाठी राज्य शासनाने १५० कोटी रुपये मंजूर केले असल्याने सोलापूर ते धाराशिव रेल्वे मार्गाच्या कामाला गती येणार आहे. धाराशिवहून गेल्या वर्षांपासून काम चालू केले असून, तुळजापूरच्या घाटापर्यंत या रेल्वेमार्गाचे काम आले आहे. धाराशिवकडून हे काम चालू असल्याने आणखी ३ ते ४ महिन्यात सोलापूरचेही काम सुरू होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या कामाला गती येण्यासाठी शासनाकडून अजून १५० कोटीचा निधी दिला असल्याने या कामाची गती वाढावी यासाठी जिल्हाधिकारी रेल्वे अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत.

नुकताच केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील रेल्वेचं जाळं विस्तारण्यासाठी मोठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. सोलापूर-तुळजापूर-धाराशिव दरम्यान देखील रेल्वे धावणार आहे. त्यासाठी राज्य शासनाने आपल्या वाट्यापैकी १५० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. याबाबतचा शासन आदेश ६ फेब्रुवारी रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे तुळजापूर तीर्थक्षेत्र रेल्वेने जोडण्याच्या अनेक वर्षांपासूनच्या मागणीला गती मिळाली आहे. तुळजापूर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून, येथे रेल्वे संपर्क व्हावा, अशी मागणी दीर्घकाळापासून होत होती. मात्र उत्पन्नाच्या दृष्टीने हा मार्ग परवडणारा नसल्याचा (नॉट फिजिबल) शेरा मारत रेल्वे प्रशासनाने हा प्रकल्प अडगळीत टाकला होता. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान हा विषय पुन्हा चर्चेत आला. त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा रेल्वेमार्ग पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. यानंतर २०१९ साली हा प्रकल्प रेल्वेच्या पिंक बुकमध्ये समाविष्ट करण्यात आला. काही असले तरी या कामाला धाराशिवकडून सुरूवात झाली असून, हे काम गतीने करण्यासाठी जिल्हाधिकारी गुरूवारी रेल्वे अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.



# अशोक लांबतुरे यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त (दलितमित्र) अशोक अण्णाराव लांबतुरे यांना वायएमसीए हॉल, दिल्ली येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात अमेरिका इंटरनॅशनल युनिर्व्हसिटी हॉलिवूड, यु.एस.ए. यांच्या वतीने डॉक्टरेट इन सोशल वर्क ही मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. अमेरिका आंतरराष्ट्रीय विद्यापीठातर्फे पुरस्कार प्रदान करण्यात येणारे हे विद्यापीठ गा. शासनाच्या निती आयोगाद्वारे नोंदणीकृत आहे.



सोलापूर शहर व जिल्ह्यामध्ये वृक्षारोपण करणे व निरनिराळे आरोग्य शिबिरे आयोजित करुन जनजागृती केलेली आहे. संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळातर्फे गार्डी येथे यमाईदेवी आश्रमशाळा चालविण्यात येत असून, या आश्रमशाळेमध्ये अनुसूचित जाती-जमातीचे २०० मुले-मुली शिकत आहेत. या विद्यार्थ्यांना डिजीटल माध्यमातून शिक्षण देण्यात येत असून, त्याचबरोबर भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये प्लेग्राऊंड, स्वच्छ आरओ पिण्याचे पाणी, हवेशीर व प्रशस्त वर्गखोल्या आहेत. अशोक लांबतुरे यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण होत असल्यामुळे प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत अमृत महोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे.

अशोक लांबतुरे हे सध्या अश्विनी सहकारी रुग्णालय, सोलापूर येथे संचालक म्हणून कार्यरत आहेत. तसेच सिध्देश्वर सहकारी बँकेचे संचालक आहेत.

# ‘होळी करा लहान, पोळी करा दान’ उपक्रम प्रेरणादायी : वाघमारे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

जनार्दन वाघमारे यांनी होळी करा लहान, पोळी करा दान या अनोख्या प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन शाळेतील विद्यार्थ्यांबरबर केले.

उपक्रमात होळीच्या सणादिवशी होलिका दहन करताना त्यात पूजेसाठी पोळी टाकली जाते.त्यामुळे त्यात अन्न वाया जाते. तीच पोळी आपण गोर गरीब गरजूंना खायला दिले तर खरी होळी साजरी केल्या सारखी होईल असे सांगितले. दरवर्षी शाळेतील विद्यार्थी आपल्या शालेय परिसरात करत असलेल्या होलिका दहनात पोळी न टाकता आपल्याकडे जमा करण्यास सांगितले. वाघमारे म्हणतात की कोणत्याही गोष्टीची अंधश्रद्धा न पाळता आपण अनिष्ट रूढी परंपरा, व्यसन, वाईट विचार होळीमध्ये जाळली पाहिजेत.



# आजपासून शहरात मिना बाजारची सुरुवात

### ७०० स्टॉल उपलब्ध राहणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

रमजान सणानिमित्त प्रति वर्षी विजापूर वेस येथे भरविण्यात येणाऱ्या मिना बाजारची सुरुवात मंगळवार १० मार्च पासून भरविण्यास सुरुवात होणार आहे.

आवश्यक सर्व वस्तुचे साहित्य विक्रीची ५०० ते ७०० स्टॉल उपलब्ध राहणार आहेत, अशी माहिती कलीम तुलजापूरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. रमजान सणानिमित्ताने अनेक हिंदु-मुस्लिम बांधव या परिसरात दुकाने थाटतात. शिरखुर्माचा सुखा मेवा, कपडे, महिलांचे सौंदर्य प्रसादने, तसेच धार्मिक ग्रंथ, लहान मुलांचे कपडे, चप्पल, अंत्तर फरोश, खजुर व रमजान ईद साठी लागणारे आवश्यक सर्व वस्तुचे साहित्य विक्रीची ५०० ते ७०० स्टॉल या मिना बाजारात असतात. व्यापारी ग्राहक यांच्या सुसुत्रता आणण्याचे काम मिना बाजार व्यापारी संघाच्या वतीने करण्यात येते. मिना बाजार व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष राजू कुरेशी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक झाली.



बैठकीमध्ये कलीम तुलजापूरे यांची सन २०२६-२७ सालाकरीता अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष जाकीर नाईकवाडी, राजा सिंदगीकर, जनरल सेक्रेटरी अशफाक बागवान, खजिनदार मुस्ताक नजम रंगरेज, कार्याध्यक्ष शकील मौलवी, प्रमुख सल्लागार हाजी मैनोद्दीन शेख, हाजी मुनाफ चौधरी, इसाक सय्यद, हाजी तौफीक हत्तुरे, जुबेर बागवान, महमदसाब सौदागर, व सदस्य पदी मंजूर बागवान, राजू कुरेशी, इम्रान सालार, वसीम सालार, याकुब अख्तर शेख व नुतन सदस्य म्हणून आरीफ सालार व आसीफ अजीज शेख आदींची निवड करण्यात आली आहे. मीना बाजारामध्ये कोणत्याही व्यक्तीचे अथवा संस्थेचे बोर्ड लावण्यास परवानगी देऊ नये. डिजीटल बोर्डामुळे शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने मीना बाजार व्यापारी संघाच्या वतीने पोलीस आयुक्त व महापालिका आयुक्त यांना निवेदन देऊन विनंती करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी मतीन बागवान, जाकीर नाईकवाडी, राजा सिंदगीकर, अशफाक बागवान, मुस्ताक नजम रंगरेज, शकील मौलवी, हाजी मैनोद्दीन शेख, हाजी मुनाफ चौधरी, इसाक सय्यद, राजू कुरेशी, बाबा सालार, वसीम सालार उपस्थित होते.

# महिलांनी आत्मविश्वासाने प्रगती साधावी : पोलिस उपायुक्त डॉ. पाटील

### विविध शाळांमध्ये महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मार्च-**

महिला आज प्रत्येक क्षेत्रात सक्षम पणे पुढे जात आहेत. महिलांनी आत्म विश्वासाने पुढे जात समाजाच्या प्रगतीत सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन पोलिस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील यांनी केले.



आंतरराष्ट्रीय महिला दिन व संकुलाचे संस्थापक अध्यक्ष कै. श्री. बाबुरावसा दत्तात्रयसा भुमकर यांच्या धर्मपत्नी कै. सौ. पार्वतीबाई बाबुरावसा भुमकर यांच्या २६ व्या पुण्यस्मरण दिना निमित्त सहस्त्रार्जुन प्राथमिक विद्यामंदिरात माता-पालकांसाठी ‘होम मिनिस्टर’ हा खेळ पैठणीचा या विशेष खेळाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. पाटील या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केशर भुमकर या होत्या. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर उपस्थित होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर सो. स. क्षत्रिय समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा वर्षा मेंगजी, युवती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा गीता हबीब यांच्या सह सारिका बिद्री, सुनंदा बारड, गायत्री कोल्हापुरे, सुनंदा शालगर, विद्या गोयल, राजश्री बंकापूर, कांचन मिरजकर, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी बिराजदार, सविता हातवळणे, संस्थेचे अध्यक्ष संजीवसा बिद्री, सचिव जयकुमारसा कोल्हापुरे, शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर, सचिव गजानन गोयल उपस्थित होते. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय शाळेच्या मुख्याध्यापिका मंजुषा माने यांनी केले. सूत्रसंचालन वंदना आळंगे यांनी केले तर आभार सुवर्णा भोपळे यांनी मानले.

माधुरी भूमकर ठरल्या मानकरी

या होम मिनिस्टर स्पर्धेत माता-पालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विविध फेऱ्यांमधून स्पर्धकांनी चुरशीची स्पर्धा करत उपस्थितांची मने जिंकली. अंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्या पुजा सागर निटुरे या मातेला माधुरी अनिल भुमकर यांच्या वतीने देण्यात येणारी रुपये १५००१ ची पैठणी, साडी, मुकुट व होम मिनिस्टरचा बॅच कार्यक्रमाच्या अध्यक्षा केशर भुमकर व परिवाराच्या वतीने देऊन सन्मानित करण्यात आले.

## वालचंद महाविद्यालय



महिला आज सक्षमपणे सर्वच क्षेत्रामध्ये कार्य करत असून त्यांच्यामध्ये सजगता असणे आवश्यक आहे असे मत वालचंद महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनोहर जोशी यांनी व्यक्त केले. वालचंद कला आणि विज्ञान महाविद्यालयात आज महिला दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्य वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थान उपप्राचार्य डॉ. राजशेखर हिप्परगी यांनी भूषविले. या विशेष कार्यक्रम प्रसंगी महिला कर्मचाऱ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यवेळी डॉ.विजया महाजन, डॉ. राव, डॉ. नागनाथ धायगुडे, डॉ. संगमेश्वर नीला, डॉ. महावीर साबळे, डॉ. दत्तात्रय कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. अंजना गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. पद्मावती पाटील यांनी केले. आभार डॉ. रेखा ओव्हाळ यांनी मानले.

## मुक्ताई ग्रुप, सोलापूर



महिला दिनानिमित्त मुक्ताई मंदिर येथे मुक्ताई महिला ग्रुप व आधार योगा ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने महिला मेळावा पार पडला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रियंका आराध्ये या होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. उमा पवार उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना मार्गदर्शन करताना डोळ्यांचे आरोग्य, त्यांची योग्य काळजी तसेच आवश्यक उपचार याबाबत माहिती दिली. यावेळी अलका गवळी तसेच वैशाली वाले या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्रास्ताविक अर्चना इंगळे यांनी केले, सूत्रसंचालन स्नेहा बनसोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन सविता होळकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिता मस्तूद, प्रतिभा धायगुडे, रंजना अलदर, नीता गिरे, नीता सावंत, अश्विनी बनसोडे, सरोजिनी गडदे, रेखा अलाट, सुनीता कलाल, ज्योती शिंदे तसेच आधार योगा ग्रुपचे भगवान बनसोडे, संजय जगताप, विजय जगताप, शंकर चौगुले, नाना कुरळे, विकास पाटील, शिवाजी जाधव माधव धायगुडे, सुभाष शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## महावीर हायस्कूल



महावीर हायस्कूलमध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका उज्वला पाटील व प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षिका अनिता सूर्यवंशी उपस्थित होत्या. प्रारंभी सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. सूत्रसंचालन बसवराज बिराजदार यांनी केले.

## कोठारी प्रशाला



श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूलमध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक रमेश यादवाड, प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका संगीता जाधव, ए.पी.आय एमआयडीसी पोलीस स्टेशन राधिका केंद्रे, महिला पोलीस विशाखा पाटील, महिला पोलीस दिपाली राठोड, विश्वस्त सुशीला उपाध्ये उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिला व पतीच्या निधनानंतर संघर्षातून संसाराचा गाडा पुढे नेणाऱ्या माता पालिकांचं महिला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्य अनिता हाडोळे, दर्शना उपाध्ये, माधुरी उपाध्ये, आरोग्य अधिकारी नेहा चाबुकस्वार, नौशाद शेख, स्वाती जानराव, शितल गुरव, स्वाती कांबळे, रेणुका होनकळस, सविता बनसोडे, गीता रेड्डी, लक्ष्मीबाई तेरदाळे, लक्ष्मी सत्तारवाले, मेघा म्हेत्रे, रेश्मा बागवान, ललिता कुंभार, राधिका सत्तारवाले यांना सन्मानित करण्यात आला. यानंतर उपस्थित महिलांमध्ये संगीत खुर्ची, मॅचींग स्पर्धा, हेअर स्टाईल स्पर्धा घेऊन विजेत्या महिला स्पर्धकांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन एस.एम बगले, एस.एस. शिंदे तर आभार ए. एस. माने यांनी मानले. महिला दिनाची सुरुवात २० व्या शतकाच्या सुरुवातीला झाली. १९०८ मध्ये न्यूयॉर्कमध्ये १५,००० महिलांनी कामाचे तास कमी करावेत, चांगले वेतन मिळावे आणि मतदानाचा अधिकार मिळावा या मागण्यांसाठी आंदोलन केले होते. पुढे १९१० मध्ये क्लारा झेटकिन यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा प्रस्ताव मांडला आणि १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी या दिवसाला अधिकृत मान्यता देण्यात आली होती.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### विद्या विकास मंदिरात महिला दिन

**करकंब, दि.९ मार्च-**
विद्या विकास मंदिर उंबरे (पागे) येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित शिक्षिका उर्मिला बुगड, सुप्रिया पाटील, पूजा रजपूत, अपर्णा जोशी यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी मुख्याध्यापक शहाजी पाटील, शिक्षक बी.एन शिंदे,के. सी.पाटील, यू.बी. भोसले, आर.जी.ढोबळे, हनुमंत कोरके, मोहन ढोबळे, हनुमंत गुरव, कृष्णा खुळपे, पांडुरंग कांबळे उपस्थित होते.




### शाह प्रशालेत सायन्स क्वीझचे आयोजन

**बार्शी, दि. ९ मार्च-**
मराठी विज्ञान परिषद बार्शी यांच्यावतीने विज्ञान दिनानिमित्त इयत्ता ९ वी मधील विद्यार्थिनींसाठी सायन्स कवीझचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्याध्यक्ष विनायक देशपांडे यांनी विज्ञान विषयाची विद्यार्थ्यामध्ये आवड निर्माण व्हावी यासाठी मराठी विज्ञान परिषदेमार्फत सायन्स कवीझचे आयोजन केल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका व विज्ञान शिक्षिका शुभदा जोशी होत्या. या कवीझमध्ये सेमी इंग्लिश माध्यमाच्या २० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला व विविध प्रश्नांची योग्य उत्तरे दिली. स्पर्धेत भक्ती लोलापोड प्रथम, सिद्धी व्हळे- द्वितीय, अक्षता आळे- तृतीय यांनी यश मिळवले. सूत्रसंचालन व आभार संदेश घाडगे यांनी मानले.



### पडसाळी येथे शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडी बिनविरोध

**मोडनिंब, दि. ८ मार्च-**
पडसाळी (ता. माढा) येथील जिल्हा परिषद शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी चांदणी राहुल मुसळे यांची तर उपाध्यक्ष पदी माधुरी अमोल नलवडे यांची बिनविरोध निवड झाली. बिनविरोध निवड करून एक आदर्श निर्माण करण्याचे काम पडसाळी येथील पालकांनी केले आहे. शाळा व्यवस्थापन समितीची निवडणूक प्रक्रिया बिनविरोध करण्यासाठी सरपंच योगेश पाटील यांनी पुढाकार घेतला. यावेळी माजी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय सलगर, तंटामुक्तीचे अध्यक्ष महेश पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष महावीर मुटकूळे, प्रविण पाटील, प्रकाश पाटील, दिपक देशमुख, सुनिल पाटील, सचिन पाटील, कुमार मुसळे, संदीप देशमुख, अमोल नलवडे, दत्तात्रय थोरात, मुख्याध्यापिका गुंड यांचे सहकार्य मिळाले.

### कोर्टात टाकलेली केस मागे घेण्याच्या कारणावरुन महिलेचा केला विनयभंग

**मंगळवेढा दि. ९ मार्च-**
कोर्टात टाकलेली केस मागे घे असे म्हणत शिवीगाळी,दमदाटी करुन एका ४९ वर्षीय महिलेच्या अंगाशी झोंबाझोंबी करुन तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी किरण (पुर्ण नाव माहित नाही), बाळू भोसले, सुशिला (पुर्ण नाव माहित नाही), पुजा भोसले (सर्व रा.शिरनांदगी) यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील पिडीत महिला दि.५ रोजी सकाळी १०.३० वाजता त्यांचे दीर यांच्या घरासमोर




भोसे येथे दुकानाच्या जागेची कोर्टात टाकलेली केस मागे घे असे वरील आरोपींनी म्हणत शिवीगाळी दमदाटी करुन फिर्यादीच्या अंगाशी झोंबाझोंबी करुन मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तसेच फिर्यादीची जावू हिस लाथाबुक्क्याने मारहाण करुन उजव्या हाताच्या दंडाजवळ चावा घेवून जखमी केले व तुमच्यावर पोक्सोची केस टाकतो असे म्हणत दमदाटी केली. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### बसस्थानकावर महिलेची पर्स चोरी, एक लाखांचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास

**बार्शी, दि.९ मार्च-**
बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने महिलेची पर्स चोरून नेल्याची घटना शुक्रवारी घडली आहे. या पर्समध्ये एक लाख रुपये किंमतीचे दोन तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र होते. या प्रकरणी संबंधित मीनाक्षी महावीर हाके या महिलेने पोलिसांत फिर्याद दिली असून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, परभणी जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या महिलेचा पती नोकरीसाठी बाहेर राहतो.

# पंढरपूर शहर-तालुक्यात रंगपंचमी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ मार्च-**
पंढरपूर शहर आणि तालुक्यात पारंपारिक संस्कृती जपत रंगपंचमीचा सण रविवारी (ता.८) साजरा करण्यात आला. गेल्या काही वर्षा पासून शहरात पाण्याचा वापर न करता कोरड्या रंगांची उधळण करीत रंगपंचमी उत्सव साजरा केला जात आहे. त्यामुळे या वर्षी देखील कोरड्या रंगाची उधळण करीत अगदी लहानग्यां पासून ते ज्येष्ठां पर्यंत सर्वजण रंगोत्सवात सहभागी झालेले दिसत होते.







रंग पंचमी निमित्त शहरात सकाळ पासून बच्चे कंपनीने रंग खेळण्यास सुरुवात केलेली दिसत होती. शहरातील बहुसंख्य दुकानदार मंडळींनी अनायसा रविवार असल्याने आणि त्यामध्येच आज रंगपंचमीचा सण आल्यामुळे रंगपंचमी निमित् दुकानांना खास सुटी घेवून रंगोत्सवा सारख्या पारंपारिक उत्सवा मध्ये सहभागी झालेले दिसत होते. शहरातील प्रदक्षिणा मार्ग, नवीपेठ, जुनीपेठ, संतपेठ, भादुले चौक, महावीर नगर तसेच उपनगरातील गजानन नगर, मनिषा नगर, लिंकरोड, टाकळी परिसर,शाकुंतल नगर, इसबावी आदी ठिकाणी तरुण, तरुणींचे जथ्थे कोरड्या रंगाची उधळण करीत ये जा करीत होते. शहर तसेच उपनगरातून अनेक ठिकाणी हौशी तरुणांनी लाऊडस्पीकर लावून त्याच्या तालावर ठेका धरित अगदी उत्साही वातावरणा मध्ये रंगपंचमी साजरी केली. या वेळी अनेक तरुणांचे जथ्थे दुचाकी वरुन मित्रमैत्रिणांना रंग लावण्यासाठी ये जा करताना दिसत होते. शहरा प्रमाणेच तालुक्यातील विविध गावांमधून रंगपंचमी उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. दरम्यान रंगपंचमी उत्सवाच्या वेळी शहर व तालुक्यात कुठेही अनुचित प्रकार होवू नये म्हणून पोलिसांनी बंदोबस्तात वाढ केल्याचे दिसत होते.

### यमाई तलावर रंगोत्सव साजरा

येथील यमाई तलाव परिसरात दररोज सकाळी, संध्याकाळी फिरावयास येणाऱ्या काही हौशी मंडळींनी स्थापन केलेल्या सुप्रभात मंडळाच्या वतीने रंगपंचमी साजरी करण्यात आली. येथील तुळशीवृंदावनाच्या समोरील बाजुस असलेल्या मोकळ्या पटांगणात रंगोत्सवास सुरुवात करण्यात आली. या रंगोत्सवात शहरातील प्रतिष्ठीत नागरिकांसह महिला, मुली तसेच बच्चे कंपनी देखील मोठ्या उत्साहात सहभागी होवून रंगोत्सवाचा आनंद घेत असताना दिसत होती. या वेळी तरुणाई अक्षरशः डीजेच्या तालावर थिरकलेली होती.

# कासारवाडी जि.प. शाळेत महिला दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ मार्च-**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला.

प्रथमतः क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच अश्विनी मंडलिक, उपसरपंच सुधीर गायकवाड, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सिद्धेश्वर जगताप, उपाध्यक्ष सुधीर माने, नितीन मंडलिक यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक वीणा कदम यांनी केले. बिनादेवी दरेकर यांनी यावेळी मार्गदर्शन केले. कार्यक्रमामध्ये रांगोळी, चित्रकला, लिंबू चमचा, संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवलेल्या महिलांचा चिकुचे रोप देऊन सत्कार करण्यात आला. शाळेची माजी विद्यार्थिनी डॉ. ज्ञानेश्वरी सुतार हिचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

ग्रामपंचायत कासारवाडीकडून उपस्थित सर्व महिलांना चिकूच्या रोपांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुधाकर बडे, अभयकुमार कसबे, बाळासाहेब मुंढे, मनीषा भोसले, रेणुका मुंढे, द्वारका पिंपळे, ग्रामसेविका सोनवणे, आबासाहेब चौधरी यांनी परिश्रम घेतले.



### झरेगाव येथे महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ९ मार्च-**
स्त्री शक्तीचा जागर आणि सन्मान करत आज झरेगाव (ता. बार्शी) येथे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. एकता महिला मंच, झरेगाव यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन एकता महिला मंचच्या प्रमुख शितल संकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी स्मिता संकपाळ, शोभा संकपाळ जया संकपाळ, विद्या जाधव उपस्थित होत्या. .

# मोडनिंब येथे इफ्तार पार्टीचे आयोजन

**आ. अभिजीत पाटील यांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ९ मार्च-**
सामाजिक सलोखा आणि एकात्मतेसाठी तसेच समानतेची जाणीव निर्माण करून आपापसांतील बंधुभाव वाढवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी केले.

मोडनिंब (ता. माढा) येथे बालाजी पाटील मित्र परिवार यांच्या वतीने रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. या इफ्तार पार्टीत हिंदू-मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित



राहून सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला. सर्वांनी एकत्रितपणे इफ्तार करून सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. यावेळी आमदार पाटील यांनी महिला दिन व रंगपंचमीच्याही शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी सभापती भारत शिंदे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील, डॉ. संतोष दळवी, बाबूराव सुर्वे, कुरण गिड्डे, नागनाथ ओहोळ, शिवाजी सुर्वे, दत्तात्रय सुर्वे, फिरोज तांबोळी, नूरभाई तांबोळी, सलमान तांबोळी, तनवीर शेख उपस्थित होते.

### करकंब येथे रंगपंचमी उत्साहात साजरी

**करकंब, दि. ९ मार्च-**
भगवान श्रीकृष्णाने राधा व गोपींसोबत वृंदावनात रंग खेळला होता त्या दिव्य मिलनाचा दिवस म्हणजे रंगपंचमी हा सण त्या अनुषंगाने करकंब (ता. पंढरपूर) येथेही हा सण साजरा करण्यात आला. लोकनृत्य, गाणी विविध रंगांचा वापर करत गाण्यांच्या तालावर तरुणाई थिरकताना दिसून आली. शुक्रवार पेठ करकंब येथे रेनडान्सचे आयोजन करण्यात आले होते. महिला दिन व रंगपंचमी सण एकाच दिवशी आल्याने महिला भगिनींनी एकमेकींना रंग लावत मनमुराद आनंद लुटला. रविवार सुट्टीचा दिवस असल्याकारणाने रंग खरेदी करण्यासाठी सकाळपासूनच लगबग सुरू झाली होती.

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ मार्च-**
महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त कौशल्य विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. शितल झिंगाडे-भस्मे, मधुबाला लोणारी, शितल फुटाणे, हर्षदा गायकवाड उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.आर. लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. डॉ. शितल झिंगाडे भस्मे यांनी केले तर आभार प्रा. जनाबाई चौधरी यांनी मानले.

### अभिजीत भोसले यांचे सीए परीक्षेत यश

**करकंब, दि.९ मार्च-**
अभिजीत अजित भोसले यांनी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट ऑफ इंडियाच्या सीए परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन केले.



अभिजीत भोसले यांचे उच्च शिक्षण पंढरपुर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात झाले. माध्यमिक शिक्षकांच्या पतसंस्थेत लेखनिक असलेले अजित भोसले यांचे ते सुपुत्र आहेत. या परीक्षेसंदर्भात सीए विकास वाघे यांचे त्यांना सहकार्य लाभले.

# मुलांना घडवताना पालकांची विशेष जबाबदारी : डंके

**दिवंगत ॲड. कुलकर्णी स्मृती व्याख्यानमाला**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ९ मार्च-**
पाठ्यपुस्तकातील यश महत्वाचे आहेच. पण केवळ त्याहीपेक्षा समाज जीवनात आपली मुलं कशी वागतात यावरच त्याचा सर्वांगिण किती विकास झाला हे कळणार आहे. त्यासाठी पालक म्हणून आपणच प्रयत्न करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन पुण्याचे नामांकित समुपदेशक मयुरेश डंके यांनी केले.

येथील नामांकित वकील आणि रा.स्व. संघाचे तत्कालीन शहर कार्यवाह स्व. पी. डी. कुलकर्णी यांच्या द्वितीय स्मृती




दिनानिमित्त आयोजित व्याख्यानाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. लोटस स्कूल आणि सुयश क्रीडा शिक्षण व बहुउद्देशीय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंचतंत्रे पालकत्वाची हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. यावेळी व्यासपीठावर नेताजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एम. ए. गायकवाड, डॉक्टर असोशिएशनचे तालुकाध्यक्ष डॉ. शैलेश झाडबुके, रा.स्व. संघाचे माजी तालुका कार्यवाह माधव तथा राजाभाऊ देशमुख, मोहोळ पत्रकार संघाचेतालुका अध्यक्ष अशोक पाचकुडवे, तालुका कार्यवाह डॉ. अमोल हराळे, गरड कॉलेजचे माजी प्राचार्य वे. शा.सं. बाजीराव जोशी, संजीव खिलारे, मच्छिंद्र गाडे-पाटील, प्रवीण डोके उपस्थित होते. सुरुवातीला स्व.पी.डी. कुलकर्णी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक ॲड. अमोल देशपांडे यांनी केले. तर लोटस स्कूल संस्थेचे अध्यक्ष प्रा. नंदकिशोर देशपांडे यांनी स्व.पी डी. कुलकर्णी यांच्या वकिली कौशल्याचा आणि सामाजिक कार्याचा गौरव केला. सूत्रसंचालन नम्रता कुलकर्णी यांनी केले. आभार केतकी देशपांडे यांनी मानले. यावेळी निवृत्त न्यायाधीश प्राची कुलकर्णी, डॉ.स्वाती हराळे, भाजपाचे जिल्हा चिटणीस आणि पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष महेश सोवनी, प्रा. मदनसिंह लाळे, मनोज गुरव, दिलीप वाघमोडे, छगन अष्टूळ, विनोद देशपांडे, विकास सरवळे, अजित भोसले, ॲड. अमोल कुलकर्णी, मानसी सोवनी उपस्थित होते.

# महिला दिनानिमित्त बार्शीत विविध उपक्रम

### ‘लेडीज हेल्थ क्लब’च्या आरोग्य स्पर्धा ठरल्या आकर्षणाचे केंद्र

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ मार्च-**
जागतिक महिला दिनाच्या औचित्याने बार्शी शहरात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महिला सक्षमीकरण, आरोग्य जागर आणि सामाजिक सहभाग या संकल्पनांना केंद्रस्थानी ठेवत शहरातील विविध संस्थांच्यावतीने कार्यक्रम पार पडले. विशेषतः लेडीज हेल्थ क्लब, बार्शी यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य स्पर्धा आणि रंगपंचमीचा दुहेरी उत्सव हे या दिवसाचे प्रमुख आकर्षण ठरले.

जागतिक महिला दिन आणि रंगपंचमीचा उत्साह अशा दुहेरी संगमात लेडीज हेल्थ क्लब, बार्शी यांच्यावतीने महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याला प्रोत्साहन देणाऱ्या विविध स्पर्धांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या उपक्रमात शहरातील अनेक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपली फिटनेस, कौशल्य आणि सर्जनशीलता दाखवून दिली. महिलांच्या शारीरिक क्षमतेची आणि सहनशक्तीची कसोटी पाहणाऱ्या प्लँक आणि स्कॉट स्पर्धा विशेष आकर्षण ठरल्या. गृहिणींपासून ते नोकरी



करणाऱ्या महिलांपर्यंत सर्वांनी या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. तसेच सूर्यनमस्कार स्पर्धेत सहभागी होत महिलांनी नियमित व्यायाम आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश दिला. यासोबतच संतुलित आहाराचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी ‘विना गॅस आरोग्यदायी रेसिपी’ स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत महिलांनी गॅसचा वापर न करता पौष्टिक, चविष्ट आणि नाविन्यपूर्ण पदार्थ तयार करून सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे रंगपंचमीचे सेलिब्रेशन. महिला दिनाच्या आनंदात रंगपंचमीचा उत्साह मिसळत महिलांनी कोरडी व सुरक्षित रंगपंचमी साजरी केली. नैसर्गिक गुलालाची उधळण करत एकमेकींना शुभेच्छा देत महिलांनी संगीताच्या तालावर आनंद लुटला. यावेळी क्लबच्या वतीने सांगण्यात आले की, स्त्री ही कुटुंबाचा आधारस्तंभ आहे. तिचे आरोग्य चांगले असेल तर संपूर्ण कुटुंब सुदृढ राहते. महिलांनी फिटनेस आणि आरोग्याबाबत जागरूक राहणे अत्यंत गरजेचे आहे.

### महिलांसाठी विविध स्पर्धा; महिला उद्योजकांचा गौरव

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत घे भरारी बार्शी बिझनेस वुमन ग्रुप आणि शब्दरंग ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, नृत्य स्पर्धा तसेच ‘मिसेस बार्शी’ स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. उपळाई रोड येथील आदित्य कृष्ण मंगल कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमात महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धांमधील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. तसेच नव्याने निवडून आलेल्या नगराध्यक्ष, नगरसेविका आणि महिला उद्योजकांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रुपच्या डॉ. वंदना यादव, दिपाली झालटे, भाग्यश्री शेळके, हर्षदा धुमाळ, रेश्मा शेळके आणि स्मिता राऊत यांनी परिश्रम घेतले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## माळशिरसमध्ये एकनाथ षष्ठी उत्साहात

**माळशिरस, दि. ९ मार्च-**

येथील श्री रामदेव श्री मारुती देव मंदिरात एकनाथ षष्ठीचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी हभप भागवत महाराज जाधव (खोरोची) यांचे गुलालाची कीर्तन सेवा झाली.

या कीर्तनात त्यांनी एकनाथ महाराज यांच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगितले. त्यानंतर दुपारी बारा वाजता एकनाथ महाराजांच्या प्रतिमेवर फुले टाकून एकनाथ षष्ठी साजरी करण्यात आली. यावेळी मंदिरात कार्यक्रमासाठी नागरिकांनी व भाविकांनी गर्दी केली होती. यात महिलांची संख्या लक्षणीय होती. कार्यक्रमानंतर ॲड. मिलिंद कुलकर्णी यांच्या वतीने भाविकांना महाप्रसादाची पंगत देण्यात आली.



## महत्त्वाचे



पंढरपूर : रंगपंचमी सणानिमित्त विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीवर रंगाची उधळण करण्यात आली होती.



### रंगपंचमीच्या रंगात रंगून गेली लहान मुले

**अकलूज, दि.९ मार्च-**

हिंदू संस्कृतीमध्ये रंगपंचमी या सणाला खूप महत्त्व आहे.यादिवशी लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.विविध रंगाची उधळण करीत एकमेकांना रंग लावणे,पिक्चारीच्या सहाय्याने रंगा एकमेकांच्या अंगावर रंग उडविणे यामध्ये लहान मुलांनी मनसोक्त आनंद लुटला. अकलूज येथील रामबाग गृह संकुलातील लहान मुले रंगपंचमी सणाचा मनमुराद आनंद लुटत आहेत.



### अकलूज पोलिस स्टेशनच्या वतीने महिलादिन उत्साहात

**अकलूज, दि.९ मार्च-**

अकलूज पोलीस स्टेशनच्या वतीने अकलूज व परिसरातील विविध क्षेत्रातील धडाडीने कार्यरत असलेल्या महिलांचा सत्कार अकलूज पोलीस स्टेशनच्या पोलीस उपनिरीक्षक करिश्मा वणवे यांचा हस्ते करण्यात आला. यामध्ये पोलीस पाटील,महिला होमगार्ड, महिला दक्षता समिती, डॉक्टर, वकील, शिक्षण क्षेत्र, समाजसेविका, पोलीस ठाणे क्षेत्राततील महिला पोलीस यांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात अकलूज नगरपरिषदेचे पहिल्या महिला नगराध्यक्ष सौ. रेश्माताई आडगळे, महिला नगरसेविका मनिषा तिकोटे, नम्रता जगताप, मृदुला सुर्यवंशी, मंदाकिनी पाटोळे, रेश्मा तांबोळी, वैशाली भोसले, उज्वला विटकर, स्वाती फुले, दिपाली वाघमोडे, जयश्री एकतपुरे, प्रियंका गायकवाड, पोलीस पाटील तेजस्वी दळवी (संगम), सुभद्रा चंदनशिवे(जांभुड), मनिषा पाटील (बोरगाव), वैद्यकीय क्षेत्रात डॉ. मानसी देवडीकर, सामाजसेविका छाया बुराडे,फातिमा पाटावाला, डॉ. मिनाक्षी जगदाळे, शिक्षण क्षेत्रात कल्पना मोरे,हसरून मुलाणी, आरती तोरणे, हसिना शेख महिला उद्योजक, हेड कॉन्स्टेबल अनुराधा अडगळे, हेड कॉन्स्टेबल मंदाकिनी चव्हाण यांचा फेटा बांधून, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.



### बंकलगी ते आहेरवाडी दरम्यान खड्डेमय रस्ता

**अक्कलकोट, दि.९ मार्च-**

बंकलगी ते आहेरवाडी रस्ता गेल्या तीन वर्षांपासून उखडल्याने जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्ता दुरुस्त करावा अन्यथा मोठे आंदोलन करण्याचा इशारा बंकलगी ग्रामपंचायतीचे जेष्ठ सदस्य डॉ. रणजीत देशमुख यांनी दिला. सार्वजनिक बांधकाम विभागाला इकडे लक्ष देण्यास वेळ मिळेल का? असा प्रश्न गावकरी विचारत आहेत. बंकलगी ते आहेरवाडी रस्त्यावर दोन माध्यमिक व तीन प्राथमिक शाळा असून हजारो विद्यार्थी, शेतकरी, वयोवृध्द नागरीक यांना अनेक अपघात होत आहेत. ऊस, पालेभाज्या, दुधाची वाहतूक, प्रत्येक कामासाठी व वैद्यकीय उपचारासाठी गावातील लोकांना सोलापूर येथे जावे लागते. दुचाकी चारचाकी वाहन चालवणे जीवावर बेतत आहे. खड्यात रस्ते की रस्ता खड्यात हा प्रश्न असून धुळीमुळे श्वसनाच्या व इतर अनेक आजाराने नागरिक त्रस्त झाले आहेत. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्ता दुरूस्तीचे काम सुरू करावे अन्यथा आंदोलन करू असा इशाराही डॉ.देशमुख व ग्रामस्थांनी दिला आहे.





पंढरपूर : शहरातील गोविंदपुरा भागातील पालिकेच्या कार्यालयाची जुनी इमारत तसेच न्यायलयाची पूर्वीची इमारत सध्या वापरा अभावी धुळखात उभी असल्याचे दिसत आहे.

## पंढरपुरात शासकीय इमारती वापराविना धुळखात

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.९ मार्च-**

शहरातील जुने नगरपालिका कार्यालय, गोविंदपूरा भागातील लोकमान्य विद्यालयाची आणि सरकारी दवाखान्याची या पालिकेच्या मालकीच्या आणि या शिवाय न्यायालयाची जुनी इमारत कित्येक वर्षापासून वापरा अभावी सध्या बंद अवस्थेत आहेत. कोट्यावधी रुपये किंमतीच्या जागांवर उभ्या असलेल्या या इमारती भव्यदिव्य असून त्या रिकाम्या पडून राहण्यापेक्षा जर वापरात आल्या तर त्याची दूरवस्था होणार नाही. त्यामुळे या इमारतींची थोडीफार डागडूजी करुन संबंधित विभागांनी त्या भाडेतत्वावर द्याव्यात अशी मागणी शहरातील नागरिकांमधून केली जात आहे.

**भाडेतत्वावर देण्याची सुज्ञ नागरिकांची मागणी**

शहरात चंद्रभागा नदी लगत असलेल्या गोविंदपूरा भागात नगरपालिकेच्या कार्यालयाची जूनी इमारत आहे. पूर्वी या इमारती मधूनच पालिकेचे कामकाज चालत असत. मात्र मध्यंतरीच्या काळात पालिकेने येथील मिरची बाजारा मध्ये भव्य अशी इमारती बांधली आहे. या नव्या बांधण्यात आलेल्या इमारती मधूनच सध्या पालिकेचे कामकाज सुरु आहे. मात्र जुनी इमारत ही गेल्या काही वर्षा पासून वापरा अभावी रिकामीच पडून आहे. या इमारती शेजारीच पालिकेच्या मालकीची लोकमान्य विद्यालयाची जुनी ब्रिटीशकालिन इमारत आहे. तिची देखील अवस्था अशीच काहीशी आहे. या बरोबरच सध्या पालिकेची सरकारी दवाखान्यातील कुटुंब कल्याण विभागाची इमारत तसेच या दवाखान्याच्या परिसरात असणारा मेडिकल ऑफिसरचा (अलिकडच्या काळातील मुख्याधिकारी निवासी) बंगला देखील वापरा अभावी पडून आहे. या सर्व इमारती अगदी मोक्याच्या ठिकाणांवर आहेत. या इमारतींच्या जागांचे बाजारमुल्य आज कोट्यावधी रुपयांचा घरात आहे. त्यामुळे या इमारतींची तात्पुरती डागडुजी करुन भाडेतत्वावर इतरांना त्या देता येवु शकतात.

**भाडेतत्वावर दिल्यास मिळणार उत्पन्न**

डागडूजी नंतर या इमारती एखादी शाळा, महाविद्यालय, इतर शासकीय कार्यालयांना किंवा सेवाभावी संस्थांना भाडेतत्वावर देता येईल. या मधून संबंधित विभागांना थोडेफार उत्पन्न मिळून आपला महसूल देखील काही प्रमाणात वाढविता येईल.

जर या सर्व इमारती वापरात आल्या तर त्यांची नियमित स्वच्छता राखली जाईल. या शिवाय एखाद्या शाळा, महाविद्यालय तसेच खासगी भाड्याच्या जागेत सुरु असणाऱ्या एखाद्या शासकीय कार्यालयास किंवा सेवाभावी संस्थेस भाडेतत्वावर या इमारती दिल्यास त्यांची देखील बऱ्यापैकी सोय होण्यास मदत होईल. त्यामुळे गेल्या काही वर्षापासून वापरा अभावी धुळखात पडून असणाऱ्या या इमारतींबाबत मालकीहक्क असलेल्या संबंधित विभागांनी लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेवून त्या बाबत आवश्यक ती कार्यवाही करावी अशी मागणी शहरातील नागरिकांमधून केली जात आहे.

**न्यायालयाची जुनी इमारत बंद**

या शिवाय येथील पंढरपूर अर्बन बँकेच्या मुख्य कार्यालयासमोरील जुन्या न्यायालयाच्या इमारतीची देखील अवस्था सध्या यापेक्षा काही वेगळी नाही. ही इमारत देखील अगदी मोक्याच्या ठिकाणी आहे. या इमारतीची जागा आणि इतर मोकळा परिसर देखील मोठा आहे. त्यामुळे ही देखील इमारत डागडूजी नंतर वापरात येवू शकते.





## महिला दिनानिमित्त पोलिसांकडून महिला, लहान मुलींचा गुलाबपुष्पाने सन्मान

● पंढरपूर उपविभागातर्फे प्रथमच उपक्रम; पंढरपूरकर महिलांमधून पोलिसांचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ मार्च-**

पंढरपूर उपविभागातर्फे महिला दिनानिमित्त सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व त्यांच्या संकल्पनेतून पंढरपूर शहरातील, पंढरपूर तालुक्यातील सर्व महिलांचा गुलाबपुष्प देवून सन्मान करण्यात आला.



पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन, शहर पोलीस स्टेशन आणि ग्रामीण पोलीस स्टेशन या पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेत महिला दिनानिमित्त लोकांच्या मनामध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने सर्व महिला पोलीस अधिकारी, महिला पोलीस अंमलदार यांच्या वतीने महिलांना गुलाब पुष्प व लहान मुलींना चॉकलेट देऊन त्यांचा सन्मान केला.

या उपक्रमातून पंढरपूर विभागातील पोलिसांनी महिला दिन साजरा केला. महिला दिनासाठी पंढरपूर उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर, पंढरपूर शहरचे पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, पंढरपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्रीमती घनवट त्याचप्रमाणे महिला पीएसआय रावण, महिला पीएसआय धडके पाटील, महिला पीएसआय बेणेवाड पोलीस उपनिरीक्षक जगताप व इतर अंमलदार यांनी सहभाग नोंदवला. या उपक्रमाचे शहरात कौतुक होत होते.

## स्मार्ट मीटर व वाढीव वीजबिलाविरोधात आंदोलन



### बार्शीतील शिवसेना पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ मार्च-**

स्मार्ट मीटर बसविणे व वाढीव वीजबिलांच्या विरोधात सुरु असलेल्या आंदोलनाला शिवसेना (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

या संदर्भात आंदोलनकर्ते अमोल डोंगरे व प्रमोद कसबे यांनी उपस्थित केलेल्या मागण्यांना समर्थन देत अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. महावितरण, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित ( महावितरण) बार्शी शहर कार्यालय येथे देण्यात आलेल्या निवेदनात स्मार्ट मीटरमुळे वाढणारी वीजबिलांची समस्या तसेच सर्वसामान्य नागरिकांवर होणारा आर्थिक ताण याबाबत प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी करण्यात आली. शिवसेना जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत ठेंगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना बार्शी तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला. याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्षा शीतल मांजरे, शिवसेना विधानसभा प्रमुख अविनाश शिंदे, बारिकराव शिंदे तसेच अन्य शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्वरांचे विचार व कार्य हे मानवतेला उन्नतीकडे नेणारे : कुलगुरु

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.९ मार्च**

महात्मा बसवेश्वरांचे विचार व कार्य हे मानवतेला उन्नतीकडे नेणारे होते असे मत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी शंकरराव मोहिते महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय परिषदेत उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी विकास समितीचे अध्यक्ष सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते पाटील होते.






मोहिते-पाटील म्हणाले की, येथे राष्ट्रीय इतिहास परिषद होत आहे, ही आम्हा सर्वांसाठी अभिमानास्पद व आनंदाची गोष्ट आहे. यावेळी महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक चंद्रकांत गार्डी, बीजभाषक गजानन धरणे, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक वसंतराव जाधव, रामचंद्र गायकवाड, उत्कर्ष शेटे व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. रणजीतसिंह माने-देशमुख, अप्पासो मगर आदी उपस्थित होते. इतिहास विभाग प्रमुख डॉ.दत्तात्रय मगर यांनी प्रास्ताविकासह बीजभाषक प्राचार्य गजानन धरणे यांचा परिचय करून दिला. प्राचार्य डॉ.शिवप्रसाद टिळेकर यांनी उपक्रमांची माहिती दिली. बीजभाषक प्राचार्य डॉ.धरणे यांनी महात्मा बसवेश्वरांच्या कार्याचा विस्तृत आढावा घेतला. या सत्राचे अध्यक्षस्थानी डॉ. चंद्रकांत चव्हाण होते.

दुसऱ्या सत्रात सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ कर्नाटक (कलबुर्गी) येथून आलेले विशेष अतिथी डॉ.बी.बी.पुजारी यांनी महात्मा बसवेश्वरांच्या कानडी भाषेत असणाऱ्या विविध वचनांवर व साहित्यावर विस्तृत विवेचन केले. महात्मा बसवेश्वरांचे कार्य हे जगभर अभ्यासले जात असून जागतिक शांततेसाठी त्यांचे विचार आजही कालसुसंगत आहेत, असे सांगितले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रभाकर कोळेकर हे होते. तिसऱ्या सत्रात दोन टप्प्यात विविध भागातून आलेल्या संशोधक प्राध्यापकांनी शोधनिबंध सादर केले. याचे अध्यक्षस्थान डॉ .शिवाजीराव वाघमोडे व डॉ.विष्णू वाघमारे यांनी भूषवले. या परिषदेत ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ .चंद्रकांत चव्हाण, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. विष्णू वाघमारे. डॉ. शिवाजीराव वाघमोडे. डॉ राजेंद्र गायकवाड, आदींनी आपले विचार व्यक्त केले. ही राष्ट्रीय इतिहास परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. विश्वनाथ आवड , डॉ. एच.के.आवताडे, डॉ.बाळासाहेब मुळीक व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा.डॉ.सज्जन पवार यांनी आभार मानले तर, विनायक प्रा. सूर्यवंशी व डॉ. संजय वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले.